PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Gadbad Ghotala
Year: 1986

Song: Surya ugvato nabhat aanik
Lyricist: Murlidhar Gode

सूर्य उगवतो नभात आणिक
कमलिनी फुलते
रवी किरणांच्या रेशीम स्पर्शी
इंद्रधनु खुलते
इंद्रधनु खुलते
मला न कळते किमया सारी
का अशी घडते
एक अनोखे मोरपीस का
गालावर फिरते
गालावर फिरते

वाऱ्यात सुगंधी धूप
हृदयात निनादे भूप
नयनात तरळते माझ्या
मनमोहक मोहन रूप
या दाही दिशांच्या गोपी
विणतात भरजरी गोफ
वेळूत वाजते वेणू
रासाला रंग अमाप
प्रेम दिवाणी मीरा मी तर
मन माझे झुरते
रवी किरणांच्या रेशीम स्पर्शी
इंद्रधनु खुलते
इंद्रधनु खुलते
मला न कळते किमया सारी
का अशी घडते
एक अनोखे मोरपीस का
गालावर फिरते
गालावर फिरते

का ओढ जीवाला लागे
हे कसले रेशीम धागे
हे कसले गीत दिवाणे
या ऊरात होई जागे
हे प्रीती म्हणती याला
हे लेणे जपण्याजोगे
प्रीतीची रीत निराळी
ही आपुल्या रंगी रंगे
दुःख कुणाचे घेऊन
कोणी सुख अपुले देते
एक अनोखे मोरपीस का
गालावर फिरते
गालावर फिरते
सूर्य उगवतो नभात आणिक
कमलिनी फुलते
रवी किरणांच्या रेशीम स्पर्शी
इंद्रधनु खुलते
इंद्रधनु खुलते

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*